# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 04/01/2024 (गुरूवार) दुपार

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर सुशिलापुरम सावरगांव रोड काटोल येथे दिनांक ०३/०१/२०२४ चे १९.०० वा. ते २१.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे— हेमराज शामराव ढोबळे, वय ४० वर्ष रा. सुशिलापुरम सावरगांव रोड काटोल हे वास्तुपुजनाच्या कार्यक्रमाला घराला कुलूप लावुन गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे लाकडी दाराचे कुलूप कोंडयासह तोडुन घरात जावुन बेडरूम मधील लाकडी कपाटात ठेवलेले नगदी ९०००/—रू. चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार वरठी यांनी भेट दिली असुन तसेच आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार रूडे मो. क्र. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावर मौजा खात येथे दिनांक ०३/०१/२०२४ चे १९.०० वा. ते १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— असलम मिनाजउद्दीन झडीये, वय २९ वर्ष रा. खात यांचे बहीणीचे पुतणीचे मौला मुडीकोटा जि. गोंदीया या ठिकाणी लग्न असल्या कारणाने परीवारासह अंदाजे १९/०० वा. सुमारास घराला कुलुप लावुन मुडीकोटा येथे गेले असता लग्नाचे कार्यक्रम आटोपुन घरी अंदाजे १२/०० वा. घरी परत आल्यावर फिर्यादीला त्याचे घराचा दरवाजा अर्धवट उघडा होता म्हणुन फिर्यादीने आत जावुन पाहीले असता घराचे हॉलमध्ये असलेले सामान अस्त व्यस्त विखरून खाली पडलेले होते. फिर्यादीचे आईचे बेड रूममध्ये असलेली लोखंडी आलमारीचा लॉक तुटलेला दिसला व आलमारी उघडी दिसली आलमारीचे आत पाहणी केली असता फिर्यादीचे आईची चांदीची जुनी तोरडी वजन १० तोळे अंदाजे किंमती ५०००/—रू. ६ सोन्याचे मनी वजन ३ ग्रॅम कि. ९०००/—रूपये व नगदी ३०००/—रूपये तसेच फिर्यादीचे बेड रूममधील आलमारीमध्ये १ ग्रॅम वजनाची सोन्याची ३ अंगठी कि. ९०००/—रू. व फिर्यादीचे पत्नीचे पायातील १५ तोळयाची चांदीचे पायजन कि. ७५००/—रू. व कानातील सोन्याचे टॉप्स वजन अडीच ग्रॅम किंमती ७५००/—रूपये व नगदी ६०००/—रूपये दिसुन आला नाही. कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप तोंडुन आत प्रवेश करून फिर्यादीचे एकुण ४७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी फॉरेन्सिक वाहनाने भेट दिली असुन सदर घटनास्थळी सहायक फौजदार जाधव यांनी भेट दिली आहे. तसेच अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार निखारे मो. क्र. ७७४१९४५१२७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर